ऑस्ट्रेलिया/यूके/यूएसए/ईयू मध्ये शिक्षण घ्यायचंय?
Education Quest Australia
भारतामधील कमी पगाराच्या नोकरीने कंटाळा आला आहे?
प्रवेश परीक्षांमुळे थकून गेला आहात?
आता परदेशात शिक्षण घेण्याची संधी मिळवा!
Applications & Visa support & Counselling
Prof. Dr.Tanmay Bagade(Australia)
यांच्याकडून मोफत वैयक्तिक मार्गदर्शनासाठी सम्पर्क साधा
educationquest33gmail.com
WhatsApp: +61421953639
Phone Number : +91 82375 45898
(Free Counselling)
www.educationquestaustralia.com

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

अमृत ७५ महोत्सव १९५०-२०२४

epaper.dainikhindusthan.com

BIGGEST AIR CONDITIONER MALL
JAPAN BRAND
1.5 TON AC
₹26499/- ONWARDS
चिठोरे यांचे मॉडर्न इलेक्ट्रॉनिक मॉल 1965
RUKHMINI NAGAR
86000 500 15

■ वर्ष ७५ वे/अंक ३१९ वा ■ ■ अमरावती, सोमवार,दिनांक ७ जुलै २०२५ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ www.dainikhindusthan.com marathe_vinod1@rediffmail.com ■ भारतीय सौर १७ आषाढ १९४७ ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.०० ■

किलो प्रमाणे मिळेल
ग्रिन नेट चे होलसेल विक्रेता
९९९ च्या खरेदरवर आकर्षक उपहार मोफत
सागर प्लास्टिक मल्टी मॉल
प्रो. प्रा. आकाश प्रकाशराव शिरभाते
चित्रा चौक, फुटाणा लाईन, अमरावती
100% होलसेल भावात
इस से सस्ता और अच्छा कही नही
8184057777
9822032885
ग्रिन नेट चे होलसेल विक्रेता
किलो प्रमाणे मिळेल ९९९ च्या खरेदरवर आकर्षक उपहार मोफत

## चंद्रभागेच्या तीरी उसळला लाखोंचा जनसागर



पंढरपूर दि. ६ : चंद्रभागेच्या तिरीपाहा मंदिरी तो पहा विटेवरीविठुल विठुल जयहरीदुमदुमली पंढरीपांडुरंग हरी तो पहा विटेवरीविठुल विठुल जयहरीअसेच काहीसं चित्र सध्या पंढरपुरात पाहायला मिळत आहे.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या पंढरीच्या श्री विठुलाची ओढ महाराष्ट्रातल्या प्रत्येक भाविकाला असते. त्यातच आपल्या लाडक्या विठुरायाचा सर्वात मोठा सोहळा म्हणजे आषाढी एकादशीचा सोहळा होय. याच दिवशी देहूवरून संत तुकाराम महाराज, आळंदीवरून संत ज्ञानेश्वर महाराज यासह अनेक संत मंडळींच्या पालख्या पंढरीनगरीत विठुरायाच्या दर्शनासाठी दाखल होतात. आज हाच आषाढीचा भव्य असा सोहळा पंढरपुरात पार पडला. यावेळी आषाढी वारीसाठी सुमारे २० लाख भाविक दाखल झाले होते.

अंगामध्ये पांढऱ्या कपड्यांचा पोशाख परिधान करत लहान-थोर सर्वच मंडळी राज्याच्या कानाकोपऱ्यातून विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरीनगरीत दाखल (उर्वरित पान २ वर)

## बा विठ्ठला राज्यावरील संकट दूर कर, बळीराजा सुखात राहू दे

### मुख्यमंत्र्यांचे विठुमाउलीच्या चरणी साकडे




पंढरपूर दि. ६ : आज आषाढी एकादशीच्या पावन दिवशी पंढरपूर नगरीत भक्तीचा महापूर उसळला आहे. पंढरीत पहाटे अडीच वाजल्यापासून पूजा, टाळ-मृदंगाचा गजर, विठुलनामाचा जयघोष सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्या हस्ते श्री विठुल-रुक्मिणीची शासकीय महापूजा पार पडली. यावर्षी मानाच्या वारकरीपदाचा मान नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील जातेगाव येथील कैलास दामू उगले आणि कल्पना उगले या शेतकरी दाम्पत्याला मिळाला. गेल्या १२ वर्षांपासून विठुलभक्तीत लीन असलेल्या उगले दाम्पत्याने पहाटे मंदिरात थेट मुख्यमंत्री दांपत्यासोबत विठुल-रुक्मिणीची पूजा केली. पूजेनंतर त्यांचा शासकीय सत्कारही करण्यात आला. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थितांशी संवाद साधला अन् विठुरायाला साकडे घातले. राज्यावरील पुढची संकटे दूर व्हावीत, बळीराजा सुखी समाधानी (उर्वरित पान २ वर)

## अर्जेंटिनाने मोदींना 'ब्युनोस आयर्स'ची चावी देऊन केले सन्मानित



अर्जेंटीना दि. ६ : पंतप्रधान नरेंद्र मोदी विदेश दौऱ्यावर आहे. ब्रिक्सच्या बैठकीपूर्वी पंतप्रधान अर्जेंटिना येथे पोहोचल होते. अर्जेंटिनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अतिशय भव्य स्वागत करण्यात आले. या दौऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ब्यूनस आयर्स शहराची चावी देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच दोन्ही देशांच्या नेत्यांनी व्यापार मजबूत करण्यासाठी द्विपक्षीय चर्चा केली. इंदिरा गांधींनंतर अर्जेंटिनाचा द्विपक्षीय दौरा करणारे नरेंद्र मोदी हे देशाचे पहिले पंतप्रधान आहेत. या भेटीनंतर दोन्ही देशांमधील व्यापारी (उर्वरित पान २ वर)


## 'ॐ गं गणपतये नमः', गणेश स्तुतीने नरेंद्र मोदींचे ब्राझीलमध्ये स्वागत



ब्राझील दि.६ : पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पाच देशांच्या दौऱ्यावर आहेत. त्यांचे ठिकठिकाणी जंगी स्वागत करण्यात येत आहे. या दौऱ्याच्या चौथ्या टप्प्यात ते ब्राझीलच्या रिओ दि जानेरो येथे दाखल झाले. या ठिकाणी १७ वे ब्रिक्स शिखर परिषद होत आहे. या शिखर संमेलनात ते सहभागी होतील. यावेळी ब्राझिलियन संगीतकारांनी त्यांना विस्मयचकीत केले. त्यांनी ॐ गं गणपतये नमः आणि जय जगदंबा माँ दुर्गा चे सादरीकरण करून सर्वांनाच अचंबित केले. पंतप्रधान या नादब्रह्मात डोलताना दिसले. त्यांनी या संगीतकारांचे कौतुक केले. त्यांना शुभेच्छा दिल्या. या सांस्कृतिक कार्यक्रमाने भारतीय संस्कृती, परंपरा यांचा परदेशातील सुंदर रूप समोर आले.

ब्राझीलमध्ये दाखल होण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अर्जेंटिनाच्या दौऱ्यावर होते. (पान २ वर)

## भारताचा 'शुभ'आरंभ, इंग्लंडचे गर्वहरण करत दणदणीत विजय, ब्रिटीशांच्या मैदानात तिरंगा फडकला



बर्मिंगहम दि. ६ : इंग्लंडचे गर्वहरण करत भारतीय संघाने ब्रिटीशांच्या मैदानात तिरंगा फडकवला. दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताने देदिप्यमान कामगिरीचा नजराणा पेश केला. शुभमन गिलने द्विशतकासह भारताच्या विजयचा पाया रचला होता. भारताच्या गोलंदाजांनी त्यावर कळस चढवला आणि त्यामुळे भारताला हा दुसरा सामना जिंकता आला. भारताने या सामन्यात ३३७ धावा राखत मोठा विजय मिळवला. या सामन्यातील विजयासह भारताने मालिकेत १-१ अशी बरोबरी केली आहे. पहिला कसोटी सामना भारताला गमवावा लागला होता. त्यानंतर या सामन्यातील विजयासह युवा भारताने या मालिकेत आता १-१ अशी बरोबरी केली आहे.

शुभमन गिलने पहिल्या डावात द्विशतकत झळकावले, तर दुसऱ्या डावात त्याने शतकही पूर्ण केले. त्यामुळे गिलच्या या धडाकेबाज फलंदाजीच्या जोरावर भारताने इंग्लंडपुढे विजयासाठी ६०८ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना भारताने इंग्लंडची चौथ्या दिवशी ३ बाद ७८ अशी अवस्था केली होती. त्यानंतर पाचव्या दिवशी भारताला विजयासाठी सात विकेट्सची गरज होती. पण पाचव्या दिवसाच्या सुरुवातीला जोरदार पाऊस आला आणि सामना वेळेत सुरु झाला नाही. पण (उर्वरित पान २ वर)

## महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा भूकंप होणार? : गिरीष महाजन



मुंबई दि. ६ : महाराष्ट्राच्या राजकारणात आणखी भरपूर घडामोडी घडायच्या बाकी असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामागे कारण देखील तसंच आहे. भाजपचे 'संकटमोचक' म्हणून ख्याती असलेले नेते गिरीश महाजन यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाबद्दल मोठा दावा केला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनेक आमदार आणि खासदार आपल्या संपर्कात असल्याचं गिरीश महाजन यांनी म्हटलं आहे. गिरीश महाजन यांनी (उर्वरित पान २ वर)

## महापालिका निवडणुकांमध्ये काँग्रेसची स्वबळाची तयारी?

मुंबई दि. ६ : आगामी महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांनी मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केली आहे. महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे नेते, पदाधिकारी मोठ्या प्रमाणात महायुतीत प्रवेश करताना पाहायला मिळत आहेत. यातच ठाकरे बंधू एकत्र येण्याचा कयास बांधला जात आहे. यातच राज ठाकरे महाविकास आघाडीत सामील होणार की, फक्त उद्धव ठाकरेंशी युती करणार, यावरूनही राजकीय वर्तुळात तर्क-वितर्क लावले जात आहेत. या घडामोडी सुरू असतानाच काँग्रेसमधून मात्र आगामी महापालिका निवडणुका स्वबळावर लढल्या पाहिजेत, असा सूर उमटत असल्याचे बोलले जात आहे.

ठाकरे बंधूंच्या मुंबईतील मेळाव्याला शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे, माजी मंत्री आमदार जितेंद्र आव्हाड आणि लहान मित्रपक्षांचे काही नेते उपस्थित होते, पण काँग्रेसचा एकही बडा नेता उपस्थित नव्हता. मराठी-हिंदीच्या वादात न पडण्याची भूमिका (उर्वरित पान २ वर)

रघुवीर
उपवास के समोसे
श्याम चौक
राजापेठ

Biggest Display of
50+ वॉटर प्युरिफायर
Under One Roof
0% EMI
Exchange Offer
Only at केडिया
C/o केडिया मॉल, श्रीकृष्णपेठ मो. 9049912413

पैसे आजार बरे झाल्यावर देणे
आजारापासून मुक्त व्हा
लहानपणाच्या चुकांमुळे नसामध्ये आलेली कमजोरी विवाहित जीवनात निराशा, टायमींगची कमी, शीघ्रपतन, शुक्राणुंची कमी मुळे संतान न होणे व शुगर मुळे शारीरिक कमजोरी सारख्या आजाराचे समाधान व मनपुर्वक संबंध मिळवण्याकरिता संपर्क करा.
बालाजी आयुर्वेदिक
7744000224
न्यू राजापेठ एसटी बस स्टँड व्यापार संकुल के अंदर अमरावती
वेळ दररोज १० ते सायं. ७ वाजेपर्यंत

बहुप्रतिक्षीत सेल शुरु
फ्रेश स्टॉक सेल
आराधना
होलसेल शॉपिंग मॉल
डिझाईनर साडीयाँ, ड्रेस मटेरिअल, कुर्तिज, सुटिंग शर्टिंग, मेन्स वेअर, किड्स वेअर
जवाहर रोड, अमरावती. 2574594
L 2, बिझीलॅन्ड, नांदगावपेठ, अमरावती.

आकर्षक डिस्काउंटसह मनमोहक खरेदी
Upto 50% OFF
मंगल सेल सच्चा सेल
• घागरा ओढणी • बनारसी शालु
• साडीयाँ • सलवार सुट
• कुर्ती • इव्हीनींग गाऊन
मंगल वस्त्रालय | मंगलम | Colors & Weaves by shreemangalam
जयस्तंभ चौक, अमरावती. 0721-2564172

एअर कंडीशनर्स
सिर्फ 20900/-* UE
DAIKIN BLUE STAR LLOYD
GENERAL MITSUBISHI HITACHI
IFB Panasonic Whirlpool
केडिया ट्रेडर्स
C/o केडिया मॉल, श्रीकृष्णपेठ, अम. मो. 9049912413

Amit R. Bijwe
Mob.: 9422917360
FISH O FISH AQUARIUM
Up to 20% Discount
• Pedigree • Royal Canin • NED • Whiskas • SmartHeart • Me-O
Dog Food & Accessories
Birds Cages
• Fishes • Fancy Imported Tank • Aquarium Accessories
Ganesh colony, Shilangan Road, (Ravi Nagar Road) Amt. 2562939

AC SPECIALIST SHOWROOM
सर्वात मोठी रेंज
58 वर्षांची सेवा
घ्या फक्त ₹1111/-* व घेऊन जा नामांकित AC
मॉडर्न इलेक्ट्रॉनिक मॉल
रुक्मिणी नगर अमरावती 8600050015

Radhika Food Junction
Rajkamal Chowk, Amravati.
New Branch Open
Radhika Cafe
Camp (Court) Amravati